# रे.दि.मु.नं. १८/२०१६ मधील
# नि.१ वरील आदेश

(दादु मोहिते विरुध्द शौकत लोहार)

वादी यांनी प्रस्तुतचा दावा अतिक्रमीत क्षेत्राचा कब्जा मिळणेसाठी दाखल केला असुन वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दावा मिळकतीची मोजणी करण्यासाठी दाखल केलेला आहे.

(२). वादी यांच्या कथनानुसार त्यांनी दावा दाखल करण्यापुर्वी दावा मिळकतीची मोजणी केली होती. सदर मोजणीमध्ये मोजणीदार यांनी वहिवाटीप्रमाणे हद्दीच्या खुणा दाखवल्या आहेत. परंतू, प्रतिवादीने वादीच्या शेतजमिनीत निश्चित किती क्षेत्राचे अतिक्रमण केले आहे याबाबत मोजणी नकाशात नमुद केलेले नाही. त्यामुळे दावा मिळकत गट नं.३९१ ची कोर्ट कमीशनर मार्फत मोजणी होणेबाबत विनंती वादी यांनी केली आहे.

(३). प्रतिवादी यांनी सदर अर्जास म्हणणे देऊन अर्जातील कथने नाकारली आहेत. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, वादीने प्रस्तुतचा

अर्ज नव्याने पुराव्याची उभारणी करण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीने दाव्यात नमुद केलेली दि.१७/०४/२०१२ रोजीची मोजणी ही बेकायदेशीर आहे. पुरावा तयार करण्याकरीता मोजणीचा आदेश करणे न्यायाचे होणार नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती प्रतिवादी यांनी केलेली आहे.

(४). मा.सर्वोच्च न्यायालयाने ***ई. नायर विरुध्द पी. नायर [१९८७ सीजे(सर्वोच्च न्यायालय)२३०]*** या न्यायनिवाड्यामध्ये असे गुणोत्तर नमुद केले आहे की, जेंव्हा दोन पक्षकारांमध्ये एकमेकालगतच्या मिळकतीच्या चतुःसिमेबाबत वाद असेल तेंव्हा तशा प्रकरचा दावा चालवण्याचा दिवाणी न्यायालास अधिकार आहे व तशा प्रकरणामध्ये हद्दी निश्चितीसाठी कोर्ट कमीशनरची नेमणुक करता येते. सदर न्यायनिवाड्यातील गुणोत्तर प्रस्तुत कामी योग्य रितीने लागु होते. प्रस्तुत कामी दावा मिळकत गट नं.३९१ ची उपअधिक्षक भुमी अभिलेख, पलुस यांचेमार्फत मोजणी होणे जरुरीचे आहे. सबब प्रस्तुत कामी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. उपअधिक्षक भुमी अभिलेख, पलूस यांची कोर्ट कमीशनर म्हणुन नेमणुक करण्यात येते.

३. कोर्ट कमीशनर यांनी मौजे आंधळी ता.पलूस येथील गट क्र.३९१ ची सरकारी अभिलेखाप्रमाणे उपलब्ध मुळ नकाशावरुन मोजणी करावी व सदर मोजणीचा वस्तुस्थितीदर्शक नकाशा म्हणजेच सदर मिळकतीच्या मुळ अभिलेखाप्रमाणे हद्द तसेच सदर मिळकतीमध्ये अतिक्रमण केले असल्यास ते कोणी केले व त्याचे क्षेत्र किती याबाबतचा सविस्तर अहवाल कोर्ट कमीशनरचे पत्र मिळाल्यापासुन दोन महिन्यात सादर करावा.

४. वादीने कोर्ट कमीशनरची फी परस्पर उपअधिक्षक भुमी अभिलेख, पलूस यांचे कार्यालयात जमा करावी. त्याचप्रमाणे कोर्ट कमीशनर यांना मोजणीकामी आवश्यक असणारी सर्व कागदपत्रे द्यावीत.

५. वादी यांनी वर नमुदप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतर कमीशन पत्र जारी करावे.

सही/xx

(के.एस.सुर्यवंशी)

पलुस.

दि.२५/११/२०१६.

सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पलुस